ISSN 2394-5303

# Printing Area™

International Multilingual Research Journal

Issue-36, Vol-01, December-2017



Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned with CamScanner

14) A Study of specific competencies required for success as Teacher educator
**Deepti Srivastwa, Dr. Rama Tyagi, Gwalior (M.P.)** || 60

15) Development of Temple Architecture And Sclupture of Peninsular India from .....
**Zahied Rahman Ganie, Bijbehara ,Anantnag Kashmir** || 63

16) FINANCIAL PERFORMANCE OF NON-PROFIT ORGANIZATION: A STUDY .....
**Dr. Yagnesh.M.Dalvadi, M/s. Neha N. Deshpande, Gujarat** || 67

17) NEW BEGINNINGS IN INDIAN FINANCIAL SYSTEM: JAN DHAN YOJANA IN INDIA
**DR. CHIRAG V. RAVAL, RADHANPUR-GUJARAT** || 71

18) INFORMATION AND COMMUNICATION TECHNOLOGY (ICT) IN ........
**Dosapaty Vasu , Meerpet, Hyderabad,** || 75

19) EMPOWERING OF WOMEN THROUGH GRAM PANCHAYATS ......
**Sumita Saha, Jalpaiguri** || 80

20) IMPACT OF ENTREPRENEURSHIP TRAINING ON SKILL DEVELOPMENT.........
**Saroj Bala Dewatwal Jaipur, Rajasthan** || 86

21) Problems and Prospects of Tourism Industry in India Literature Review Study
**Mosleh Abdu Mosleh AL-Najjar, Ishwara. , Mangalore** || 95

22) TREND OF E-RETURN FILING IN DIRECT TAXES
**Gaurav Sharma Asst., Dr. S. K.Agrawal Asst., Raipur (C.G.)** || 102

23) निवडणूकीच्या राजकारणात जात आणि जातीयवादाची भूमिका व प्रभाव
प्रा.डॉ. राजेंद्र एम. झाडे, चामार्शी || 104

24) कान्हा येथील कान्हेश्वर शिवमंदीराचा अभ्यास
डॉ. पिंपळपल्ले राजाराम रामा, हिंगोली || 108

25) मंगरूळपीर तालुक्यातील अनुसूचित जातीचा ग्रामपंचायत आणि विधानसभा ......
डॉ. गजानन जी. हिवराळे, कामरगा || 110

26) सर्वोदय- विनोबा
डॉ.सिध्देश्वर सटाले, गेवराई || 116

27) 'स्वातंत्र्य चळवळीतील भारतीय स्त्रियांचे योगदान '
डॉ. विनोद बाबूराव बोरसे, देवगाव || 119

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

26

# सर्वोदय- विनोबा

डॉ.सिध्देश्वर सटाले
राज्यशास्त्र विभागप्रमुख
र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, गेवराई

**प्रस्तावना**

सर्वोदयाची कल्पना महात्माजींना रस्किनच्या Unto this Last या ग्रंथावरुन सुचली. सर्वोदयाचे मूलभूत सिध्दान्त तीन आहेत. ते पुढीलप्रमाणे- (१) सर्वांची उन्नती करणारी अर्थव्यवस्था, ही सर्वोत्कृष्ट होय. यातील अनुस्युत तत्त्व असे की, सामुदायिक हितात व्यक्तीचे हित समाविष्ट आहे; सर्वांच्या भल्यात आपलेही भले आहे. (२) वकील वा न्हावी या दोघांच्याही श्रमाचे मूल्य सारखेच मानले पाहिजे. कारण सर्वांना श्रम करुन आपले जीवन जगण्याचा सारखाच अधिकार आहे. याचा अर्थ असा की, कोणत्याही समाजोपयोगी श्रमात, मूल्याच्या बाबत भेदभाव मानला जाऊ नये. (३) साध्यासुध्दा मजुराचे वा शेतकऱ्याचे जीवन हेच जीवन होय. सर्वोदयाच्या साऱ्या तत्त्वज्ञानाची इमारत या तीन मूलभूत सिध्दान्तावर आधारलेले आहे.

**सर्वोदयी राज्य विश्लेषण :**

खरे लोकशाही वा जनतेचे राज्य म्हणजे सर्वोदयी राज्य. स्वराज्याचा खरा अर्थ आत्मसंयम. आत्मसंयम सदाचाराचे प्राण होतो. सदाचारी व्यक्तीच स्वराज्याचे सुख भोगतात. स्वराज्यामध्ये कोणी कोणाचा शत्रु असणार नाही, कोणी दरिद्री वा बेकार राहणार नाही. अशा राज्यात दारु, दुराचार व जुगार चालणार नाही. वर्गद्वेषाला येथे थारा नाही. उच्चनीचतेचे भेद येथे नष्ट होतील. राजकीय सत्ता प्राप्त करणे हे साध्य राहणार नाही, तर जीवनाच्या प्रत्येक विभागामध्ये आपली स्थिती सुधारण्याचे ते एक साधन राहील. राजनैतिक सत्ता याचा अर्थ आपल्या प्रतिनिधींच्या मार्फत राष्ट्रीय जीवनाचे नियंत्रण करणे होय. परंतु राष्ट्रीय जीवन इतके परिपूर्ण व्हावे व त्याने स्वतःचेच नियंत्रण करावे, म्हणजे मग प्रतिनिधींची गरजच भासणार नाही. अशा स्थितीला 'ज्ञानपूर्ण अराज्यवाद' असे म्हणता येईल. अशा स्थितीत प्रत्येक व्यक्ती आपल्या कल्पनेप्रमाणे स्वयंशासन करेल, परंतु त्याचा शेजाऱ्याला मात्र उपद्रव होणार नाही. अशा आदर्श व्यवस्थेत राज्य असणार नाही किंवा राजनैतिक सत्ताही असणार नाही, परंतु असे आदर्श राज्य निर्माण होणे कठीण आहे, म्हणून कमीतकमी शासन करणारे सरकार हेच सर्वोत्तम सरकार (राज्य) होय.

व्यक्तीला मताधिकार १८, २१ ते ५० वयापर्यंत असावा ; प्रांतीयता नसावी ; राज्य हे धर्मनिरपेक्ष असावे, अन्य राज्यांशी मैत्रीचे संबंध असावेत, आंतरराष्ट्रीय शांति-संघाची स्थापना व्हावी, असे विचार, या संदर्भात गांधीजींनी व्यक्त केले आहेत.

सर्वोदय हा जनतेचा समाजवाद आहे, असे जयप्रकाश नारायण म्हणतात. म.गांधीच्याच सर्वोदयी विचारांचा विस्तार आचार्य विनोबा भावे यांनी केला. राज्याच्या सामर्थ्यांच्या उपयोग करुन समाजवाद प्रस्थापित करण्यापेक्षा लोकांच्या ऐच्छिक प्रेरणेतून, समाजवादी जीवनातूनच समाजवाद निर्माण झाला तर तो सामाजिक दुःखावर तोडगा ठरेल, अन्यथा नाही. सर्वोदयात पुढील गोष्टी अभिप्रेत आहेत- १) स्वायत्त ग्रामराज्ये २) ग्रामीण समस्यांवर जवळजवळ एकमताने निर्णय घेणे ३) गरजा मर्यादित राखणे ४) आपले प्रश्न व समस्या सोडविण्याचे सामर्थ्य लोकांमध्येच निर्माण करावयाचे म्हणजे सरकारचा हस्तक्षेप कमीत कमी होईल, सरकारचे साहाय्यही कमीत कमी लागेल, परंतु समाजातील सर्वांचे कल्याण साधले जाईल. आणि सुसंवादही निर्माण होईल.

सर्वोदय समाजरचनेची कल्पना मांडताना आचार्य विनोबा भावे यांनी स्वराज्याची कल्पनाही मांडलेली आहे. ते म्हणतात की, सर्वोदय समाजरचनेमध्ये प्रत्येक खेड्यात ग्रामपंचायत राहील आणि गावातील प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार पंचायतीला राहील. ग्रामपंचायतीच्या हाती सारी सत्ता राहील आणि वरच्या सरकारच्या हाती नाममात्र सत्ता राहील. वरचे सरकार फक्त सल्ला देईल आणि रेल्वे, रस्ते आणि परदेशांशी व्यवहार त्यांच्यावर त्यांचे नियंत्रण राहील. अशामुळे महत्वाकांक्षी लोकांना सत्ता हस्तगत करण्यात आज जेवढा उत्साह वाटतो तेवढा मग वाटणार नाही. कारण मग प्रांतांच्या किंवा केन्द्राच्या हाती काही अधिकारच राहणार नाही. सारा अधिकार गावकऱ्यांच्या हाती राहील आणि ग्रामपंचायतीचे काम 'पाचामुखी परमेश्वर' या नियमाने चालेल.

ग्रामपंचायतीचा निर्णय पाचामुखी परमेश्वर या नियमाने जरी झाला तरी केन्द्राचा निर्णय मात्र एकमतानेच झाला पाहिजे, असे विनोबा म्हणतात. विचारात भेद असले तरी आचाराचे बाबतीत सर्वांचे एकमत झाले पाहिजे. शासनमुक्त समाज व स्वयंपूर्ण गावे ही सर्वोदयी समाजरचनेची उद्दिष्टे आहेत. शासनमुक्त समाज म्हणजे शासनहीन समाज नव्हे. सर्वत्र अंदाधुंदी, बेंदली, बेशिस्त माजून जे अराजक निर्माण होते त्याला शासनमुक्त समाज म्हणता येणार नाही. शासनमुक्त समाज म्हणजे अशा समाजात काही लोक शासके व उर्वरित शासित



Scanned with CamScanner

असा प्रकार नसतो, तर समाज व त्यातील प्रत्येक व्यक्ती ही स्वयंशासित असते. स्वयंशासनाच्या दोन बाजू आहेत. (एक) विकेन्द्रित सत्ता व (दोन) हिंसेच्या शक्तीवर आमचा मुळीच विश्वास नाही. प्रेम व अहिंसा यावर आमचा विश्वास आहे असा प्रकारचे शिक्षण, मानसशास्त्र आणि तत्वज्ञान लोकात पसरविणे. या दोन गोष्टी जेव्हे साध्य होतील तो समाज शासनमुक्त झाला, असे म्हणता येईल. प्राचीन काळचे एक वचन असे आहे की, "राज्य करणारा राजा मेल्यानंतर नरकात जातो" (राज्यांते नरकप्राप्ति :) राज्य व स्वराज्य यातील भेद स्पष्ट करुन सांगताना विनोबा म्हणतात की, 'दिल्लीहून चालणारे ते राज्य मग ते आमचे लोक का चालवीत ना ! दिल्लीहून चालते ते राज्य, पण गावोंगावी प्रत्येक मनुष्य स्वतःवर चालवितो लोक का चालवीत ना! दिल्लीहून चालते ते राज्य, पण गावोगावी प्रत्येक मनुष्य स्वतःवर चालवितो ते स्वराज्य. मला स्वतःला उपाशी राहावे लागले तरी हरकत नाही, पण मी चोरी करणार नाही याचे नाव स्वराज्य. माझ्यावर जर दुसऱ्याची सत्ता चालत असेल तर ते स्वराज्य कसले ? स्वराज्याचा अर्थच हा की, स्वतःचे स्वतःवर राज्य. अशा प्रकारे ज्यावेळी लोकांना स्वतःवर नियंत्रण घालण्याची शक्ती येईल व त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव होईल त्यावेळी स्वराज्य येईल.' तोपर्यंत राज्यच चालेल. आम्हाला स्वराज्याचे काम करावयाचे आहे. त्यावेळी जनशक्ती निर्माण करावयाची आहे. कोणाची सत्ता आमच्यावर व आमची सत्ता कोणावरही चालणार नाही; ह्या दोन गोष्टी मिळून स्वराज्य होते. हे काम सरकारी शक्तीने होणार नाही. लोक-मानसात परिवर्तन करुनच होऊ शकेल. त्यासाठी हृदयबुध्दीची गरज आहे. लोकात जाऊन हृदयशुध्दि होईल असा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठीचे यज्ञ, तप, दान या गोष्टी आहेत.

केन्द्रित सत्ता व श्रेष्ठ - कनिष्ठ भाव यामुळे समाजात, राज्यसंस्थेत सारे दोष निर्माण होतात, अशी सर्वोदयवाद्यांची धारणा दिसते व त्यामुळे ते विकेन्द्रिकरणावर व समतेवर भर देतात. जमीन व्यापून टाकणाऱ्या गवतामध्ये जसे बंध निर्माण होतात, त्याप्रकारच्या बंधनानी जगातील सारी माणसे बध्द झाली की श्रेष्ठ - कनिष्ठपणा उरतच नाही. उत्तम राज्याच्या लक्षणाची चर्चा करताना विनोबा म्हणतात की, 'राज्य करणारे कोठे आहे ?' या प्रश्नाचे उत्तर जर 'ते शेतात काम करीत आहे; ते चर्चा करतात, सल्ला देतात.' असे जर आले तर ते उत्तम राज्याचे लक्षण मानावे. आदर्श राज्य हे डाळिंबाच्या दाण्यासारखे असावे. डाळिंबातला प्रत्येक दाणा वेगवेगळा असतो; त्याप्रमाणे एका मोठ्या स्टेटस्‌मध्येही वेगवेगळी स्टेटस् राहू शकतील. डाळिंबाचा प्रत्येक दाणा स्वतंत्र असतो. त्याला वेगळी पेशी असते. परंतु सर्व मिळून एकच डाळिंबाचे फळ बनते. त्याप्रमाणे प्रत्येक गाव स्वतंत्र स्टेट होईल आणि अशी असंख्य स्टेटस् मिळून एक मोठे स्टेट बनेल आणि अशी मोठी स्टेटस् एकत्र आली की जगाचे एक स्टेट निर्माण होईल. अशी रचना आम्हाला ग्रामदानाच्या साहाय्याने बनवावयाची आहे.

विनोबाजींच्या स्वयंपूर्ण स्वयंशासित ग्रामराज्यात अन्न, वस्त्र व शिक्षण योग्यायदल्याची सत्ता ही खेड्यातच राहील. लोकशाहीतला बहुमत व अल्पमत हा भेदही विनोबांना मान्य नाही. ते म्हणतात की, बहुमत व अल्पमत हा प्रश्न कृत्रिम आहे. यापासून मुक्त व्हावयाचे असेल तर सत्तेचे विकेन्द्रीकरण केले पाहिजे. राजनीती या शब्दावर टीका करताना ते म्हणतात की, 'राज' आणि 'नीती' हे शब्द एक दुसऱ्याचा छेद करतात. जेथे नीती येते तेथे राज्यव्यवस्था आपोआप खंडित होते; आणि जिथे राज्यव्यवस्था येते तिथे नीती समाप्त होते. राज्यसंस्थेची सत्ताच काढून घेतली की राज्य- संस्थेचे महत्वच उरणार नाही व राज्यसंस्था आपोआप लयाला जाईल.

विनोबाजींचे वरील विचार आकर्षक दिसतात यात शंकाच नाही. परंतु यात अनेक गोष्टी गृहित धरल्या आहेत. त्या थोडक्यात तपासून पाहू. सत्तेचे विकेन्द्रीकरण झाले म्हणजे सत्ता नष्ट होत नाही, ती फक्त विखुरली जाते. मानवामानवात केन्द्रसत्ता हस्तगत करण्याबाबत जसा संघर्ष होतो, स्पर्धा होते तसा प्रकार ग्रामसंस्थेबाबतही होतो व होत राहणार. मानवी जीवनातच मुळी सत्ता व संघर्ष आहे. दुसरे असे की, शहरे ही, दुर्गुणांची आगरे व खेडी म्हणजे सद्गुणांची वसतीस्थाने अशी भ्रामक, रम्य कल्पना कित्येकांची असते. ग्रामराज्य हे सुराज्य व स्वराज्य होईल याची खात्री कोण देईल ? खेडेगावात गावगुंडी, दडपशाही, भ्रष्टाचार आणि अत्याचार होतातच. तिसरे असे की मानवाच्या नैसर्गिक सुष्ट- दुष्ट प्रवृत्ती सर्वत्र सारख्या राहणारच. त्या नष्ट होणार नाहीत. डाळिंबाच्या फळाचे उदाहरण योग्य वाटत नाही. डाळिंबाच्या दाण्यांना संरक्षण करणारे कवच नसेल तर प्रत्येक दाणा हा स्वतंत्र राहू शकणार नाही. नियमाने, शासनानेच मानवी विकास होतो. नियम कोणते व कसे आणि कोणी करावयाचे आणि शासन हे कोणी, कोणावर व कोणत्या पध्दतीने करावयाचे या बाबत मात्र मतभेद होतात म्हणून निरनिराळ्या राज्यव्यवस्था निर्माण होतात.

आचार्य विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या विचारवंतांनी सर्वोदयाची निव्वळ कल्पनाच मांडली नाही तर त्याचा अंगिकार करण्याचाही प्रयत्न केला. विनोबा भावे यांनी भूदानाची, ग्रामदानाची चळवळ आरंभून शेतीहीन शेतमजूर आणि जमीनदार वर्ग यांच्यातील संघर्षाला यांना शरण गेले आणि त्यांनी आनंदाने बंदिवास पत्करला. तुरळक का होईना, अशा घटना घडतात हेच सर्वोदयाचे फल आहे.

**टीका :** सर्वोदय सिध्दान्त चांगला असला तरी त्यात काही मूलभूत दोष आहेतच. "सर्वेपि सुखिनःसन्तु। सर्वे सन्तु निरामया:। सर्वे भद्राणि पश्यन्तु। या कश्चित दुःखमाप्नुयात।।" हा ध्येयवाद फार

प्राचीन कालापासुन चालत आलेला आहे. ध्येय उत्तम आहे हे खरे, पण ते साध्य कसे करावे, हा खरा जटिल प्रश्न आहे. काम क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह आदि षड्‌रिपूंना जिंकणारा मानव निर्माण झाला तर राज्यसंस्थेचीच काय, पण कोणत्याही सामाजिक संस्थांची, धर्मांची आवश्यकताच राहणार नाही. माणूस हा मुळात चांगला आहे हे गांधीवादाचे वा सर्वोदयवादाचे गृहित तत्वच मुळी चुकीचे आहे. माणसाचे नियमन केले तरच प्रगती होते, त्या नियमनासाठी दंडशक्ती वापरावी लागते आणि तो दंडही 'पचाहे' वापरावा लागतो हे जे कौटिल्याने सांगितले तेच खर आहे. मनुष्य मुळात तत्पूर्वीचे जीवन जगणारे लोक हे सुखी नसते का झाले ? एवढेच काय पण हजारो वर्षे संतांनी सदुपदेश करूनही माणसे चांगली वागत नाहीत, हाच अनुभव जगभर सर्वत्र येतो. राज्यसंस्था ही पाशवी सामर्थ्यातून निर्माण झाली, ती हिंसेचा आश्रय करिते म्हणून राज्यसंस्था वाईट हे गृहित- तत्वही चुकीचे आहे. राज्यसंस्था ही मानवाच्या गरजेतून, समाजाच्या गरजेतून निर्माण झाली. राज्य-संस्था ही बलाचा उपयोग करते हे खरे, पण हा बलाचा अधिकार राज्यसंस्थेला कसा मिळाला हे पाहिले म्हणजे त्यात हिंसा राज्यसंस्थेचा उद्देश नाही, हे लक्षात येते. जीवित-वित्ताची अन्तर्गत सुरक्षितता व परकीय आक्रमणापासुन सुरक्षितता लाभावी यासाठी राज्यसंस्थेचा उदय झाला. अर्थात ही सुरक्षितता साध्य करावयाची तर त्यासाठी नियम (कायदे) हवेत, पैसा (कर) हवा. राज्यसंस्था शासन कोणाला करते तर जे राज्याच्या जीवितहितवित्ताच्या सुरक्षिततेचा फायदा घेतात आणि नियम मात्र पाळीत नाहीत त्यांना ! यात मुळत: अनैतिक असे काय आहे ? राज्यसंस्थेच्या आतीत असे जे संस्थेचा उदय या संबंधीची सर्वोदयवाद्यांची गृहित तत्वे चुकीची आहे.

सर्वोदयाचे ध्येय साध्य होण्यामध्ये व्यावहारिक अडचणीही खुप आहेत. यंत्रयुगाने मान-वाच्या भौतिक सुख साधनात इतकी भर टाकली आहे की, जुने खेड्यातील साधेसुधे जीवन आता कोण पत्करणार, हा प्रश्नच आहे. आर्थिकदृष्ट्या विचार केला तर 'स्वयंपूर्ण खेडे' ही कविकल्पनाच ठरणार आहे. मोटार, रेडिओ, टेलिव्हिजन, विमान अशा वस्तूंच्या निर्मितीच्या बाबतीत देशही जिथे स्वावलंबी, स्वयंपूर्ण होत नाही तिथे खेड्याचा काय पाड ? गेल्या शतकापासून मानवी जीवन इतके गुंतागुंतीचे आणि परस्परावलंबी झालेले आहे की, स्वयंपूर्ण देशाची कल्पनाही आता मूळ धरीत नाही. म्हणून ग्रामराज्याची आणि ग्रामस्वराज्याची कल्पना आता अगदी अव्यवहार्य आहे. जी गोष्ट स्वयंपूर्ण ग्रामाची तीच सरकारच्या हस्तक्षेपाची ! कमीतकमी शासन करणारे, म्हणजेच नागरी - जीवनात हस्तक्षेप करणारे सरकार सर्वोत्कृष्ट, ही कल्पनाही आता कालबाह्य झाली आहे. राज्याच्या कार्याचे क्षेत्र दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत आहे, त्यामुळे व्यक्तीच्या जीवनावर राज्याचे नियंत्रण वाढले आहे, पण ते सारे व्यक्तीच्या कल्याणासाठीच आहे. आधुनिक राज्ये मानवाच्या गर्भावस्थेपासून ते मृत्युपर्यंत त्याच्या कल्याणाच्या दृष्टीने अनेकविध गोष्टी करीत असतात व त्याही लोकांच्या वाढत्या मागण्यांनुसार करीत असतात लोकमताचा दबाव आणि काळाची गरज यामुळे राज्याचे कार्यक्षेत्र वाढले आहे. खरे सुखी जीवन साध्य करावयाचे असल्यास, आधुनिक काळात राज्याला आपले कार्यक्षेत्र वाढविणे अपरिहार्यच आहे. राज्याचे कार्यक्षेत्र कमी करणे आता शक्य होणार नाही.

**सारांश :** सर्वोदय - वाद हा कल्पनारम्य आहे, यात शंकाच नाही. तथापि, त्याने काहीच उपयुक्त कार्य साधले नाही, असे म्हणता येणार नाही. भौतिक सुखांचा अतिरेक, राज्याचा व्यक्ति-जीवनात वाढता हस्तक्षेप यामुळे काही नवीनच समस्या निर्माण झालेल्या आहेत. पाश्चात्य राष्ट्रांमधून विशेषत: युरोप - अमेरिकेत अशा याची प्रतिक्रियाच होत आहे. मानवी जीवनाला मानवी जीवन म्हणून काही अर्थ राहणार आहे की त्याचेही प्रतिक्रियाच होत आहे. मानवी जीवनाला मानवी जीवन म्हणून काही अर्थ राहणार आहे की त्याचेही 'सरकारीकरण' होणार, असा आजचा जटिल प्रश्न आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच. ॲरिस्टॉटलने मध्यममार्गाचा जो उपदेश केला, तोच खरा आहे. भौतिकसुखांच्या पाठीमागे लागल्यामुळे मानवी मूल्ये विसरून जाणारी वृत्तीचा बनलेला समाज एका बाजूला आणि मानवी मनावर संयम, असंग्रह, विश्वस्तकल्पना अशा सुसंस्कृत कल्पनांचा पगडा मानवी मनावर बसवून सर्वांचे कल्याण साधू इच्छिणारा सर्वोदय ही दोन आत्यंतिक टोके झाली. या दोन्हीचा सुवर्णमध्य साधण्यात मानव यशस्वी झाला तर मानवी जीवन सुखी होईल.

गांधी, विनोबा यांच्या रुपाने मानव जास्तीतजास्त किती उच्चपदाला जाऊ शकतो, हे अखिल मानव जातीला कळून आले, हा सर्वोदयाचा मानवजातीला झालेला लाभ होय !

**संदर्भ :**


१. डॉ.पा.श्री. जोशी : राजकीय विचारांचा इतिहास

२. डॉ.एन.जयपालन : इंडियन पॉलिटिकल थिंकर

३. डॉ. सुधाकर जोशी : भारतीय राजकीय विचारवंत


□□□



Scanned with CamScanner